**शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिताना त्यामध्ये अपंगांबाबतच्या दृष्टीकोनाची नोंद घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सीएफआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/१३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०११

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीएफआर १२९५/प्र.क्र.३६/९५/१३, दि. १ फेब्रुवारी, १९९६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीएफआर १२९५/प्र.क्र.३८२/१३, दि.७ मे, २००२.

**शासन निर्णय :-**

मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिकांमध्ये दिनांक १५.१.२०११ रोजी दिलेल्या आदेशाद्वारे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालामध्ये अपंगाविषयी दृष्टीकोनाबाबतचा एक मुद्दा समाविष्ट करण्याच्या सूचनेबाबत, राज्य शासनाने विचार करुन निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, **राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवालात त्या अधिकारी/ कर्मचाऱ्याच्या अपंगाविषयी दृष्टीकोनाबाबतचे अभिप्राय सर्वसाधारण मुल्यमापनामध्ये नमूद करावेत. या निर्णयास अनुसरून, राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदित करताना** सर्व प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी प्रतिवेदन करताना सर्वसाधारण मुल्यमापन या रकान्यामध्ये सर्वसाधारण मुल्यमापनासोबतच संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचा अपंगांबाबत असलेला दृष्टीकोनदर्शक अभिप्राय **(जसे, मदतीचा किंवा सहानुभूतीचा किंवा असहानूभूतीपूर्ण किंवा तटस्थ)** नोंदवावेत.

२. सर्व मंत्रालयीन विभागांनी व विभागप्रमुखांनी या सूचना सर्व प्रतिवेदन अधिकाऱ्यांच्या तात्काळ निदर्शनास आणाव्यात.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या बेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०४२७ १६३६१२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( पां.जो.जाधव )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

मा.उप मुख्यमंत्री यांचे  सचिव
सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई (पत्राने)
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने)
सर्व मंत्रालयीन विभाग
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख (संबंधित मंत्रालयीन विभागांमार्फत)
आयुक्त, अपंग कल्याण, पुणे (यांना त्यांचे पत्र क्रमांक अकआ/प्र.-७/ अंमलबजावणी/ १०-११/४३९, दिनांक ०४.०२.२०११ ला अनुसरून अग्रेषित)
सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ (यांना त्यांचे पत्र  क्रमांक न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/सुधार-३, दिनांक ३१.०१.२०११ ला अनुसरून अग्रेषित)
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती.

*****